# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली दिनांक:- ०४/०३/२०१८

## माओवादयांचा हल्ला निष्प्रभ

- *माओवादयांचे १ पिस्टल व १० काडतुस सी-६० जवानाकडून जप्त*

एटापल्ली उपविभाग अंतर्गत येणाऱ्या पोमके गट्टा (जां.) येथे भरलेल्या आठवडी बाजारात बंदोबस्तासाठी तैनात असलेल्या गट्टा (जां.) येथील सी-६० चे जवान पोलीस नाईक गोंजी मट्टामी याचेवर माओवादयांनी दुपारी ०३.०० ते ०३.३० वाजेच्या दरम्यान हल्ला चढविला. दोन ते तीन साध्या वेषातील माओवादयांनी गोंजी मट्टामी यांचेकडील एके ४७ हिसकावण्याचा प्रयत्न केला असता मट्टामी यांनी प्रसंगसावधान राखत माओवादयांवर जोरदार हल्ला चढविला यामध्ये माओवादयांनी त्यांचेकडील पिस्टल गोंजी मट्टामी यांच्या दिशेने रोखले असता मट्टामी यांनी माओवादयांकडील पिस्टल हिसकावून घेतले यात दुसऱ्या माओवादयाने आपल्या सोबत आणलेला चाकु मट्टामी यांच्या छातीच्या खालील बाजुस मारला. तरीही न डगमगता मट्टामी यांनी प्रतिकार चालुच ठेवला. बंदोबस्तातील इतर पोलीस अधिकारी व कर्मचारी घटनास्थळावर मदतीसाठी धावून येत असल्याचे पाहून भितीने घाबरून जावून माओवादयांनी तेथून जंगलात पळ काढला. सी-६० चे जवान लगेचच त्यांचा पाठलाग करत त्याच्या दिशेने धावले परंतु घनदाट जंगलाचा फायदा घेवून माओवादी घटनास्थळावरून पळून गेले.

यानंतर मड्डामी यांना तातडीने उपचारासाठी नागपूर येथे हलविण्यात आले असून जवानाची प्रकृती स्थिर आहे. यामध्ये माओवादयांकडील पिस्टल व त्याचे १० काडतुस मड्डामी यांच्या प्रसंगसावधानामुळे व बहादुरतेमुळे मिळण्यास पोलीस दलास यश आले. सदर परिसरात नक्षलविरोधी अभियान तीव्र करण्यात आले आहे.